बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि020 -25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

# वृत्तपत्रीय निवेदन

**" दक्षता जागृती सप्ताह २०२२ "च्या निमित्त्याने बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे देशभरात " विशेष ग्राहक भेट मेळाव्यांचे आयोजन**

**पुणे दिनांक १४ नोव्हेंबर २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या देशभरातील सर्व शाखा व विभागीय कार्यालयांमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी " विशेष ग्राहक मेळावे " आयोजित केले आहेत. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी व बँकेच्या जन- भागीदारी या संकल्पनेला अधिक बळकटी देण्यासाठी देशभरात अशा विशेष महाग्राहक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. " दक्षता जागृती सप्ताह २०२२ " निमित्य **" भ्रष्टाचार मुक्त भारत- विकसित भारत " या अभियानाचा एक भाग म्हणून या विशेष ग्राहक महामेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.**

या निमित्याने स्थानिक पोलीस स्थानकाचे प्रभारी अधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस उपाधीक्षक , पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त सहायक पोलीस आयुक्त अशा अधिकाऱ्यांना शाखा व विभागीय कार्यालयांमधील या ग्राहक महामेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात येईल. पोलीस कर्मचारी बंधू ज्या निस्वार्थी, निष्ठापूर्वक व समर्पित वृत्तीने समाजाची व देशाची सेवा करतात, त्याबाबत कृतज्ञता व्यक्त करण्याचा बँकेने या महाग्राहक मेळाव्याद्वारे प्रयत्न केला आहे. त्याच प्रमाणे बँकेच्या कर्मचाऱ्यांनी व ग्राहकांनी शाखेत व बाहेर करावयाचे सुरक्षा उपाय व इंटरनेट वर विविध व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी, तसेच भ्रष्टाचार विरोधात जागरूकता बाळगण्याबाबत मार्गदर्शन करतील व त्यामुळे समाजाला मोठ्या प्रमाणावर मदत होईल.

सदर विशेष ग्राहक महामेळाव्यात उच्च नेटवर्थ असलेल्या व्यक्ती, रिटेल , मध्यम लघु व सूक्ष्म उपक्रम, ज्येष्ठ नागरिक / निवृत्तीवेतन धारक, शेतकरी अशा जीवनाच्या विविध क्षेत्रातील ग्राहकांना निमंत्रित करण्यात येईल. तसेच बँकेकडून कर्ज घेतलेल्या व तत्परतेने परतफेड करणाऱ्या दुर्बल घटकातील कर्जदार, स्वयंसहाय्य बचत गटातील सभासद, रस्त्यावरील फेरीवाले, मुद्रा कर्जदार ग्राहकांचा देखील बँकेतर्फे सत्कार करण्यात येईल.

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि020 -25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

बँक व ग्राहकांमध्ये अधिक उत्तम संबंध असावेत, कल्पना व संकल्पनांचे आदान प्रदान व्हावे, वित्तीय समावेशन अधिक खोलवर झिरपावे, ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांचे त्वरेने निराकरण व्हावे यासाठी सदर ग्राहक महामेळावे आयोजित करण्यात आले आहेत. वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून कोणत्या प्रकारची सावधगिरी बाळगावी व डिजिटल माध्यमातून सुरक्षितपणे कसे व्यवहार करावेत याबाबत ग्राहकांना मार्गदर्शन करण्यात येईल. एक सुरक्षित व प्रागतिक समाज निर्माण होण्यासाठी पोलीस विभाग देत असलेल्या निस्वार्थी सेवेसाठी पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येईल.